महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
" कस्तुरी बिल्डीग" तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०११६/११८ Extn-४११ EMail ID :- aotm-dat@mah.gov.in

क्र.संलेको/कोषा/सलेअ-१/नस्ती क्र.१४/प्रोत्साहन भत्ता/२०२५/1651 दिनांक : 08 DEC 2025

प्रति,

सहसंचालक,
लेखा व कोषागारे, नाशिक/अमरावती/नागपूर/छत्रपती संभाजी नगर/कोकण/पुणे विभाग.

विषय : नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १५ टक्के किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेयतेबाबत.

संदर्भ :
१. आदिवासी विकास आश्रमशाळा शिक्षक व कर्मचारी संघटना , महाराष्ट्र राज्य , नाशिक यांचे पत्र क्र. सीटू संघटना टीसी-जा.क्र.४०२/२०२५ दि. १७.११.२०२५.
२. महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास विभाग, सेवानिवृत्त कर्मचारी संघटना यांचे पत्र क्र. ०७/२०२५ दि.१८.११.२०२५.
३(अ).आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिएसपी -१०८६ /८७१०/प्र.क्र३१/का-५ दि.०९.०३.१९९०.
३(ब).आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५ दि.०५.०२.१९९९.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएफ -२००० /प्र.क्र.३ /बारा दि.०६.०८.२००२.
५. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. आस्था -१७०१ / प्र.क्र.११४ /भाग-३/का.१५ दि.०९.११.२००५.
६. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, यांनी प्रबंधक (निरीक्षण-१) उच्च न्यायालय यांना अग्रेषित केलेले पत्र क्र.संकिर्ण२०२४/ ७३७/ प्र.क्र.३०६ /कार्या-६ दि.०१.०४.२०२५.

७. कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, यांचे आयुक्त आदिवासी विकास विभाग यांना पृष्ठांकित केलेले पत्र क्र.अआशा-२०२५/प्र.क्र.७३/का.११ दि.०९.०६.२०२५.

८. कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, यांचे पत्र क्र. MTD-३६०२४/४७/२०२५-MTD(Desk१५) दि.१४.०७.२०२५.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीत आदिवासी विकास आश्रमशाळा शिक्षक व कर्मचारी संघटना , महाराष्ट्र राज्य , नाशिक व महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास विभाग, सेवानिवृत्त कर्मचारी संघटना यांनी नाशिक विभागातील आदिवासी नक्षलग्रस्त / अतिसंवेदनशील क्षेत्रात काम करणा-या अधिकारी / कर्मचारी यांना मुळ वेतनाच्या १५% किमान २००/- व कमाल १५००/- च्या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता कोषागार / उपकोषागार कार्यालयाकडून अनुज्ञेय करण्यात येत नसल्याची बाब संचानालयांच्या निदर्शनास आणली आहे.

याबाबत राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना सद्य:स्थितीत अनुज्ञेय असलेल्या विविध सवलती शासन निर्णय दि.०६.०८.२००२ मध्ये सुधारीत करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शासन निर्णय दिनांक ०५.०२.१९९९ मध्ये अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी कर्मचारी यांना त्यांचे मूळ वेतनाच्या १५ % इतका किमान रु.२००/- कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत अनुज्ञेय आहे. महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग यांचे शासन परिपत्रक दिनांक ०९.११.२००५ मध्ये वाढीव प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय असलेले अतिसंवेदनशील क्षेत्राबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्वसाधारण आदिवासी क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांना सध्या घेण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्याच्या रकमेत मात्र कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. त्यांना शासन निर्णय दिनांक ०५.०२.१९९९ चे निर्णयानूसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता लागू राहील असे नमूद आहे.

उपरोक्त प्रमाणे शासन निर्णयात स्वयंस्पष्ट निर्देश दिलेले असतांना सुध्दा काही कोषागार कार्यालयात सदर शासन निर्णयातील तरतुदींबाबत संभ्रम निर्माण झाल्याचे संदर्भीय पत्रान्वये संघटनांनी संचालनालयाचे निदर्शनास आणले आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता या अनुषंगाने आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांनी उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ७ व ८ अन्वये खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०६.०८.२००२ रोजीच्या शासन निर्णयानूसार सद्यस्थितीत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना ६/७ व्या वेतन आयोगातील मूळ वेतनावर अथवा जो वेतन आयोग लागू असेल त्यानुसार मूळ वेतनावर १५% इतका किमान

रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत सुधारीत दराने प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर तरतुदीप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही करावी.

तसेच कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी प्रबंधक (निरीक्षण-१) उच्च न्यायालय, मुंबई यांना संदर्भिय पत्र क्र.६ अन्वये सामान्य प्रशासन विभाग सेवा-१ (कार्यासन-१२) मंत्रालय, मुंबई यांनी प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत असे कळविलेले आहे.

दि.०६.०८.२००२ च्या शासन निर्णयानूसार अधिकारी / कर्मचारी घेत असलेल्या मूळ वेतनाच्या १५% किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता देण्याची तरतूद असल्याने दि.०६.०८.२००२ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

वरील निर्देश विचारात घेता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०६.०८.२००२ मधील परिच्छेद २ ( ब ) मधील प्रोत्साहन भत्त्याच्या सुधारीत सवलती नूसार नक्षलग्रस्त / अतिसंवेदनशील क्षेत्रात मुख्यालय असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांना मूळ वेतनावर १५% प्रोत्साहन भत्ता किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- या मर्यादेत अनुज्ञेय राहील असे नमूद आहे तेथे ५ व्या वेतन आयोगाच्याच मूळ वेतनावर अनुज्ञेय करावा असा उल्लेख नाही. तसेच उपरोक्त क्षेत्र वगळता सर्वसाधारण क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांना आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.०५.०२.१९९९ नूसार देय असणा-या प्रोत्साहन भत्त्याच्या रकमेत मात्र कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

वरील सर्व मुद्दे विचारात घेता संदर्भ क्र. ६ मध्ये नमूद सामान्य प्रशासन विभागाने दिलेले अभिप्राय तसेच ७ व ८ च्या संदर्भीय पत्रान्वये आदिवासी विकास विभागाने दिलेले निर्देश पाहता नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील क्षेत्रात कार्यरत अधिकारी / कर्मचारी सध्या घेत असलेल्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील तसेच सर्वसाधारण आदिवासी क्षेत्रात कार्यरत कर्मचा-यांना आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.०५.०२.१९९९ नूसार अनुज्ञेय प्रोत्साहन भत्ता देय राहील. सदर बाब आपले स्तरावरुन अधिनस्त कोषागार व उपकोषागार कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र, मुंबई.

**प्रत :** १. आदिवासी विकास आश्रमशाळा शिक्षक व कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य नाशिक, कॉ.नरेंद्र मालूसरे संकूल, सीटू कामगार भवन, खुटवडनगर, नाशिक-८.

२. महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास विभाग, सेवानिवृत्त कर्मचारी संघटना.

D:\AAO TM\TIPANI LETTER\एकस्तर आदिवासी विभाग.docx

९५

**वाढीव प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय**
**असलेले अतिसंवेदनशील क्षेत्र**
**स्पष्टीकरणात्मक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र.आस्था-१७०१/प्र.क्र.११४/भाग-३/का.१५
मंत्रालय विस्तार, मुंबई - ३२.
दिनांक : ९ नोव्हेंबर, २००५

वाचा :- (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.नं.३१/का.५, दिनांक ९ मार्च, १९९०
(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/९३/का.१५, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३
(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५, दिनांक ५ फेब्रुवारी, १९९९.
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा, दिनांक ६ ऑगस्ट, २००२.

परिपत्रक :- आदिवासी भागात वास्तव्य करण्यास व तेथे काम करण्यास अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रेरित व्हावे यासाठी शासनाने सर्वप्रथम दिनांक १ जानेवारी, १९८९ पासून दरमहा विशिष्ट दराने प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याची योजना सुरु केली आहे. यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व विविध सवलतींचे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-२ (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय दि.५ फेब्रुवारी, १९९९ नुसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. नक्षलग्रस्त क्षेत्र गृह विभागाच्या शासन निर्णय क्र.एनएएक्स-२००४/प्र.क्र.४८/विशा-१ ब, दिनांक ७ डिसेंबर,२००४ अन्वये घोषित करण्यात आले आहे. मात्र अतिसंवेदनशील क्षेत्राबाबत स्पष्ट आदेश नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.६.८.२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ (ब) प्रमाणे प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय ठरविण्यास अडचणी येत असल्याबाबत विविध कार्यालयांकडून विचारणा करण्यात येत आहे. सबब याबाबत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

GR. NO-20051117153616001

CAMILIND TARECR 111 OF 2001
रोटा/एच-1263(1,500-11-2005)-1

२. राज्यात स्थापन करण्यात आलेल्या एकूण २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांपैकी प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने व सर्व यंत्रणा एकछत्री अंमलाखाली आणण्याच्या उद्देशाने खालील ११ प्रकल्प कार्यालये संदर्भाधीन दि.९ नोव्हेंबर, १९९३ च्या शासन निर्णयान्वये अतिसंवेनदनशील म्हणून निवडण्यात आली आहेत :-

(१) जव्हार. जि.ठाणे
(२) डहाणू, जि.ठाणे
(३) नाशिक,जि. नाशिक
(४) कळवण, जि.नाशिक
(५) तळोदा, जि.नंदूरबार
(६) किनवट, जि.नांदेड
(७) धारणी, जि.अमरावती
(८) अहेरी, जि.गडचिरोली
(९) भामरागड, जि.गडचिरोली
(१०) गडचिरोली, जि.गडचिरोली
(११) पांढरकवडा, जि.यवतमाळ.

३. सदर प्रकल्प क्षेत्र वाढीव प्रोत्साहन भत्त्यासाठी अतिसंवेदनशील म्हणून ग्राहय धरण्यात यावीत. या ११ एकात्मिक आदिवासी प्रकल्प क्षेत्रातील जी गांवे/ शहरे संदर्भाधीन दि.९ मार्च, १९९० च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये समाविष्ट आहेत त्या गावात/शहरात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या व मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील. सर्वसाधारण आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संदर्भाधीन दि.५ फेब्रुवारी, १९९९ च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता लागू राहील.

४. शासनाच्या सर्व विभागांनी वरील परिच्छेद-३ प्रमाणे अतिसंवेदनशील क्षेत्रात कार्यरत असलेल्या व यापूर्वी अनुज्ञेय ठरविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत कार्यवाही करावी.

५. हे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२४२/१२, दिनांक १४.१०.२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दु. र. चंद्रिकापुरे )
अवर सचिव

प्रति,
राज्यपालांचे सचिव,

952
07/05/25

Administrative Department
High Court Appellate Side
Bombay

Inward No. 3600
Date : 17/4/25

16 APR 2025

B (Gen)
16/04/2025

SECTION OFFICER
INDEX BRANCH

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

क्र. संकिर्ण २०२४/७३७/प्र.क्र.३०६/कार्या-६ दिनांक :-०१.०४.२०२५.

प्रति,

प्रबंधक (निरीक्षण-१),
मा.उच्च न्यायालय,
मुंबई-३२.

**विषय:-** आदिवासी व नक्षलग्रस्त भागांत मुख्यालयात असलेल्या सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतनाच्या १५ टक्के (किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/-) या मर्यादेत भूतलक्षी प्रभावाने प्रोत्साहन भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता मंजूर करण्याबाबतचा .

**संदर्भ:-**आपले पत्र क्र.ब(जन)-१००/२०२४/१४६२, दि.१६.०८.२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आदिवासी व नक्षलग्रस्त भागांत मुख्यालयात असलेल्या सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतनाच्या १५ टक्के (किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/-) या मर्यादेत भूतलक्षी प्रभावाने प्रोत्साहन भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्याची थकबाकी अदा करण्याच्या अनुषंग कार्यवाही करण्याची विनंती या विभागाने सामान्य प्रशासन विभागास केली होती.

२. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभाग/सेवा-१(कार्या-१२) यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत:-

"यासंदर्भात मा. न्यायालयाच्या आदेशाचे निर्देशाचे अवलोकन केले असता, दि.६.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय भत्ते प्रदान करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. दि.६.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार अधिकारी / कर्मचारी घेत असलेल्या **मूळ वेतनाच्या १५ टक्के किमान रुपये २००/- व कमाल रुपये १५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता देण्याची तरतूद असल्याने**, याप्रमाणे कार्यवाही करुन मा. न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करणे आवश्यक आहे. **त्यामुळे दि. ६.२.२००२ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.**"

३. तरी, सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त अभिप्रायानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपली,
मीनाकोळी
०१/०४/२०२५
( मीना कोळी )
कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन

19/15

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दुरध्वनी क्र. -०२२ २२०४ ८७८९** **Email:pawankumar.bandgar@nic.in**

**File No.: MTD-36024/47/2025-MTD(Desk15)** **दिनांक: १४ जुलै, २०२५.**

प्रति,

१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२) सर्व अपर आयुक्त,आदिवासी विकास.
३) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**विषय:** आदिवासी भागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत.

**संदर्भ:** १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/०२/१९९९.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०८/२००२.

महोदय / महोदया,

आदिवासी विकास विभांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना संदर्भाधीन क्र. २ व ३ येथील शासन निर्णयातील तरतुदींन्वये ६/७ व्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु. २००/- व कमाल रु. १५००/- दरमहा अदा करण्याच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

**२.** आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/०२/१९९९ अन्वये **आदिवासी उपयोजना क्षेत्रात** कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्यात आला असून, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०८/२००२ अन्वये प्रोत्साहन भत्त्याशी संबंधित सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, प्रोत्साहन भत्ता मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु. २००/- व कमाल रु. १५००/- दरमहा या मर्यादेत अनुज्ञेय करण्यात आला आहे.

**३.** प्रस्तुत प्रकरणी संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेता, सद्यस्थितीत ***आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचारी*** यांना ६/ ७ व्या वेतन आयोगातील मूळ वेतनावर १५% इतका किमान रु. २००/- व कमाल रु. १५००/- दरमहा या मर्यादेत सुधारित दराने प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

४. सबब, परि. क्र. ३ येथे नमूद केल्याप्रमाणे संबंधितांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही करावी तसेच त्याबाबतची थकबाकी देय असल्यास ती नियमानुसार अदा करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

PAWANKUMAR
BAPURAO
BANDGAR

Digitally signed by PAWANKUMAR BAPURAO BANDGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=03c5c62c2ef482c6f6b1ec581e7ff012104aacd8b9
44bed6bd52110b37bfbe5, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=DDD9DA5FA21A90D7D094A7A28297309E
ED70A74C6C632CA84301EB132C1FB5FD,
cn=PAWANKUMAR BAPURAO BANDGAR
Date: 2025.07.14 18:20:26 +05'30'

(पवनकुमार बंडगर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

57/15


महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
मंत्रालय (विस्तार), पहिला मजला
Email ID : मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
pravin.sathe@nic.in मुंबई-४०००३२


क्रमांक : अआशा-२०२५/प्र.क्र.७३/का.११ दिनांक ०१ जून, २०२५

प्रति,

प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
जव्हार जि. पालघर

विषय- रिट पिटीशन क्र. २४५७/२०२३
श्री. निवृत्ती भास्कर कोरडे वि. महाराष्ट्र शासन व इतर
संदर्भ - आपले क्र. जा.क्र. आस्था २०२५/प्रप्र/का.११(८)/५७० जव्हार जि. पालघर
दि २४.०१.२०२५ चे पत्र

महोदया,

संदर्भाधीन पत्रान्वये, आपण नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत मार्गदर्शन मिळण्याकरीता प्रस्ताव शासन स्तरावर सादर केला होता. त्या अनुषंगाने आपणांस पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.६.८.२००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार, राज्यात नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रुपये २०० व कमाल रुपये १५०० दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. सदर तरतुदीनुसार सदर भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना जो वेतन आयोग लागू असेल त्यानुसार मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रुपये २०० व कमाल रुपये १५०० दरमहा प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे.

PRAVIN
GORAKSHANATH SATHE

(प्रविण साठे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत- आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
# उपकोषागार कार्यालय ,जव्हार जि. पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२० - २२२९०७
Email Id- [illegible]

जा.क्र.उपकोकाजि/प्रो. भत्ता/ २७ /२०२५
दि. 01.07.2025

प्रति,
मा. कोषागार अधिकारी,
जिल्हा कोषागार कार्यालय,
पालघर

विषय - आदिवासी भागात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत.

संदर्भ - १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय , क्रमांक टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा/ दि. ०६/०८/२००२.
२. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. अआशा-२०२५/प्र.क्र.७३/का.११ दि. ०९/०६/२०२५.
३. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार , यांचे पत्र क्र. लेखा-२०२५/प्र.क्र.वेत/का.-५(३) ३८७२ दि. २८/०६/२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६.०८.२००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार, केवळ नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रुपये २०० व कमाल रुपये १५०० दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. संदर्भ क्र ०२ अन्वये सदर तरतुदीनुसार सदर भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना जो वेतन आयोग लागू असेल त्यानुसार मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रुपये २०० व कमाल रुपये १५०० दरमहा प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. असे कळविले आहे.

त्यानुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार जि. पालघर या कार्यालयाचे व त्यांच्या अधिनस्त आश्रमशाळा व वस्तीगृह यांची वेतन देयके सादर केली असून त्या देयकांमध्ये आदिवासी भागात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता काढावे दराने मागणी करण्यात आली आहे, तरी सदरची वेतन देयके पारीत करावी अथवा कसे ? या बाबत मार्गदर्शन होण्यास विनंती आहे.

सोबत- संदर्भ क्र ०१ व ०३

आपला विश्वासू

(आशिष साडेगावकर)
प्र. अप्पर कोषागार अधिकारी,
उपकोषागार कार्यालय, जव्हार